३५५०६

**पत्र**

जा.क्र./ रा.तां.स./न.क्र.९७/ गुनि५/        /२०२१
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
दिनांक:२६/१०/२०२१

**प्रति,**

**मा.संशोधन संचालक,**

**१. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**२. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**

**३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी**

**४. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**विषय :** कृषि विद्यापीठांनी व खाजगी उद्योजकांनी विकसित केलेल्या कृषि यंत्र व औजारांचा राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेत समावेश करण्यासाठीच्या कार्यपद्धतीच्या मार्गदर्शक सूचना'

**संदर्भ:** शा.नि.क्र कृयायो-०४२१ /प्र.क्र.६४/१४ अे ,मंत्रालय,मुंबई-३२ दि. ११ मे २०२१

संदर्भीय शासन निर्णयान्वये कृषि विद्यापीठांनी व खाजगी उद्योजकांनी विकसित केलेल्या कृषि यंत्र व औजारांचा राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेत समावेश करण्यासाठीची कार्यपद्धती देण्यात आली आहे. शासन निर्णय मधील मुद्दा क्र. १ अन्वये विद्यापीठ स्तरावर गठीत करावयाचे तांत्रिक समितीची रचना व कार्यपद्धती याबाबत विद्यापीठाकडून माहिती मागवून समितीची रचना करण्यात आली असून मा.आयुक्त (कृषि) यांचे मान्यतेने त्याचा समावेश मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्यात आला आहे. तसेच खाजगी उद्योजकांनी विकसित केलेल्या परंतु स्वामित्व हक्क नसलेल्या (Non Patented) नाविन्यपूर्ण यंत्र औजारांचा योजनेतील समावेशासाठीच्या कार्य पद्धतीचा अंतर्भाव देखील यात करण्यात आला आहे. या अनुषंगाने कार्यपद्धती बाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना सोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत. त्यानुसार आपले स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

सोबत: **वरीलप्रमाणे**

( दिलीप झेंडे )
**कृषि संचालक ( नि. व गुनि. )**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**

**कृषि विद्यापीठांनी व खाजगी उदयोजकांनी विकसित केलेल्या नविन व नाविन्यपुर्ण कृषि यंत्र व औजारांचा राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेत समावेश करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती**

**मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ - शासन निर्णय क्रमांक-कृयांयो-०४२१ /प्र.क्र.६४ /१४ -अे दिनांक ११ मे २०२१**

राज्यात सदयस्थितीत कृषि विभागाव्दारे कृषि यांत्रिकीकरण उपअभियान ही महत्वाची केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. याशिवाय राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण कार्यक्रम व राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या माध्यमातुन देखिल शेतक-यांना केंद्र शासनाचे यादीत समाविष्ट असलेल्या विविध प्रकारच्या कृषि यंत्रे व औजारे खरेदी साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजावणी करतांना शेतक-यांकडून त्या त्या विभागात स्थानीक पातळीवर प्रचलीत असलेल्या विविध प्रकारच्या औजारांची मागणी क्षेत्रीय कार्यालयांकडे करण्यात येते.

राज्यातील चारही कृषि विद्यापीठाद्वारे विविध स्वरुपाची नविन व नाविन्यपुर्ण औजारे विकसित करण्यात आलेली आहेत. तथापी, सदर औजारांचे विदयापीठाच्या स्तरावर मोठ्याप्रमाणात व्यावसायिक उत्पादन करण्याच्या मर्यादा लक्षात घेता त्याचा लाभ शेतक-यांना देता येत नाही. त्याचप्रमाणे खाजगी उत्पादकांनी देखिल अनेक नाविन्यपुर्ण यंत्र व औजारे विकसित केलेली आहेत.परंतु त्याचा योजनेत समावेश नसल्यामुळे ती शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध होत नाहीत. यास्तव राज्यात कृषि विद्यापीठाव्दारे विकसित नविन यंत्रे/औजारांचे उत्पादन करण्यासाठी खाजगी उत्पादकाची नियुक्ती करणे आणि सदर औजारांचा राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेत समावेश करणेबाबतची प्रक्रिया विहीत करण्याचा तसेच खाजगी उत्पादकांनी विकसित केलेल्या नाविन्यपुर्ण यंत्र औजारांचा राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमध्ये समावेश करण्याबाबत प्रक्रिया विहीत करण्याच्या प्रस्तावास शासन निर्णय क्रमांक: कृयायो-०४२१ /प्र.क्र.६४ /१४ अे दिनांक ११ मे २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.सदर कृषि यंत्रे व औजारे राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेत समावेश करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चिीत करण्यात येत आहे.

**अ) कृषि विद्यापीठांनी विकसित केलेली कृषि यंत्र व औजारांची खाजगी उदयोजकांकडुन व्यावसायिक तत्वावर निर्मिती करण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने खाजगी उदयोजकांची निवड करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे.**

१. कृषि विदयापीठाने विकसित केलेली व संयुक्त कृषि संशोधन समिती( Joint Agresco)ने शिफारस केलेली कृषि यंत्र व औजारे खाजगी उदयोजकांकडुन उत्पादित करण्यासाठी प्रत्येक कृषि विदयापीठ स्तरावर खालीलप्रमाणे तांत्रिक समिती गठीत करण्यात येत आहे.

**२. कृषि विदयापीठ स्तरावरील तांत्रिक समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| 1 | **संचालक संशोधन** | **अध्यक्ष** |
| 2 | सहयोगी अधिष्ठाता (कृषि अभियांत्रीकी महाविदयालय) | सदस्य |
| 3 | विभाग प्रमुख, कृषि यंत्रे व शक्ती विभाग | सदस्य |
| 4 | विभागीय कृषि सहसंचालक (संबंधित विभाग).(पुणे,लातुर,अमरावती व ठाणे) | सदस्य |
| 5 | प्रतिनिधी (कृषि उपसंचालक,कि.ना.व औजारे )कृषि आयुक्तालय,पुणे | सदस्य |
| 6 | शेतीसाठी आवश्यक विविध औजारे/यंत्रे तयार करणारा किंवा वापरणारा तांत्रिकदृष्ट्या सक्षम प्रगतीशील शेतकरी | सदस्य |
| 6 | **प्रमुख संशोधक (अखिल भारतीय समन्वयीत कृषी औजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प,अथवा संशोधन संचालक यांनी नामनिर्देशित प्रमुख,कृषि यंत्र उत्पादन केंद्र)** | **सदस्य सचिव** |

**कृषि विद्यापीठाद्वारे खाजगी उत्पादकांशी आपसी सामंजस्य करार** (MOU)**करताना करावयाची कार्यवाही**

३. कृषि विदयापीठ स्तरावरील उपरोक्त गठीत तांत्रिक समितीने खाजगी उत्पादकांच्या पात्रतेचे निकष व स्वामित्व धनाची( royalty) रक्कम निश्चित करावी.

४. स्वामित्व धनाची रक्कम निश्चित करण्याकरीता कृषि यंत्र व औजारांची शेतक-यासाठीची उपयुक्तता व नाविन्यता विचारात घेण्यात यावी.

५. स्वामित्व धनाची रक्कम प्रत्येक वर्षाकरीता वार्षिक विशिष्ट रक्कमेच्या स्वरुपात आकारण्यात यावी.अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेली स्वामित्व धनाची रक्कम संबंधित उत्पादकाने दरवर्षी संबंधित कृषि विदयापीठाकडे भरावी लागेल.

६. सदर करार (MOU) हा तंत्रज्ञान हस्तांतरण व यंत्र/औजारांचे उत्पादन व विक्री यासाठी करण्यात यावा. सदर करार कालावधीनंतर त्यास मुदतवाढ अथवा फेरकरार करण्याचा अधिकार कृषि विदयापीठाचा राहील.

७.उत्पादकांच्या पात्रतेचे निकष व स्वामित्व धनाची रक्कम निश्चित झाल्यानंतर कृषि विद्यापीठाद्वारे विकसित कृषि यंत्रे/औजारे निर्मीतीसाठी व खाजगी उत्पादकांमध्ये गुणात्मक स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी जाहीरात देऊन अधिकाधिक उत्पादकाकडुन स्वारस्याचा अभिव्यक्ती प्रस्ताव (Expression Of Interest) मागवुन सक्षम व ज्या उत्पादकाकडे औजारे उत्पादनासाठी किमान पायाभुत सुविधा उपलब्ध असेल अशाच उत्पादकांशी उत्पादन व विक्रीच्या अनुषंगाने आपसी सामंजस्य करार (MOU) करणेत यावा.

८. कृषि विद्यापीठाद्वारे कृषि यंत्र व औजारांच्या व्यावसायिक उत्पादनासाठी खाजगी उत्पादकाकडे आवश्यक असलेल्या सुविधांची तपासणी करुन तसेच सर्व तांत्रिक बाबीची पुर्तता होत असल्याची खातरजमा करुन सक्षम व पात्र ठरणा-या उत्पादकांसोबत कृषि विद्यापीठांनी सामंजस्य करार (MOU) करावा.

९. कृषि यंत्र व औजारांच्या व्यावसायिक उत्पादनाच्या प्रक्रियेत जास्तीत जास्त उत्पादकांना समाविष्ट करण्याच्या दृष्टीने दरवर्षी स्वारस्याचा अभिव्यक्ती प्रस्ताव (Expression Of Interest) मागवुन नविन उत्पादकांचा या पॅनेलमध्ये समावेश करावा. अशाप्रकारे,एकाच उत्पादकाची मक्तेदारी तयार होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी व जास्तीत जास्त सक्षम उदयोजकांना उत्पादन तयार करण्याकरीतां प्रोत्साहित करण्यात यावे.

१०. कृषि यंत्र व औजारांची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीमे कृषि विद्यापीठांनी उत्पादकाकडे उत्पादित होणा-या औजारांपैकी वार्षिक किमान २ टक्के कृषि यंत्र औजारांची भौतीक व तांत्रिक तपासणी करावी. सदर तपासणीचा खर्च संबंधित उत्पादकाकडुन घेण्यात यावा.

११.कृषि विदयापीठाशी सामंजस्य करार (MOU) केलेल्या उत्पादकाच्या उत्पादन युनिट ची विदयापीठाचे अधिका-यांनी वरचेवर भेटी देवुन करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग होतो किंवा कसे याची तपासणी करावी.

१२. उत्पादकांने पुनश्च इतर उत्पादकाशी/त्रयस्थ व्यक्ती/कंपनी/ संस्था यांचेशी उपकरार करता येणार नाही अशा अटीचा समावेश विद्यापीठाद्वारे (MOU) मध्ये करण्यात यावा.

१३. अशी उत्पादने व्यापारी तत्वावर खुल्या बाजारात विकण्यास उत्पादकाला मुभा राहील. या उत्पादनावर व त्याबाबत प्रकाशित करण्यात येणाऱ्या माहितीपत्रकावर- '------------------ कृषि विद्यापीठाद्वारे विकसित' असा उल्लेख करणे अनिवार्य राहील.

१४. यंत्रे/औजारे यांची गुणवत्ता रहावी यासाठी कृषि विदयापीठाशी करार (MOU) केलेल्या उत्पादकाकडील तांत्रिक कर्मचा-यांना आवश्यकतेनुसार यंत्रे/औजारे निर्मितीबाबत तांत्रिक प्रशिक्षण विद्यापीठाद्वारे देण्यात यावे. प्रशिक्षणाचा खर्च उत्पादकाने करावा.

१५. कृषि विदयापीठाशी आपसी सामंजस्य करार (MOU) केलेल्या उत्पादकाने औजाराचा एक मुळ नमुना जतन करण्यासाठी कृषि विदयापीठाकडे हस्तांतरीत करावा.

१६.कृषि विद्यापीठाद्वारे विकसित नविन यंत्र/औजारांची निर्मिती आपसी सामंजस्य करार केलेल्या उत्पादकाव्दारे करण्यात येणार असली तरीही सदर औजारांचे किंमतीचे बाबनिहाय दर पृथ्थकरण (Rate Analysis) विदयापीठाकडुन सादर करणे आवश्यक राहील.

१७. करार केलेल्या खाजगी उत्पादकाकडुन निर्मित यंत्र/औजारांबाबत उत्पादकाचे संबधित विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१८. विदयापीठाशी करार केलेल्या सदर उत्पादकाची मागणीप्रमाणे सर्व जिल्हयात औजारांचा पुरवठा करण्याची तयारी असावी व तसे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१९. कृषि विद्यापीठाद्वारे विकसित व चारही कृषि विदयापीठांच्या संयुक्त कृषि संशोधन विस्तार व समन्वय समितीव्दारे (JOINT AGRESCO) मान्यताप्राप्त व शिफारसीत अशी सर्व नविन कृषि औजारे योजनेतील समावेशासाठी पात्र राहतील.

२०. नविन कृषियंत्र/औजारे परीक्षण अहवालाचा (Test Report ) वैध कालावधी व त्याची वैधता तपासणी संस्था (कृषि विदयापीठाकडुन) वाढवुन घेण्याची जबाबदारी विदयापीठाशी करार (MOU) केलेल्या उत्पादकाची राहील.

२१. सदर यंत्र व औजाराचा विहीत नमुन्यातील तपासणी अहवाल संबंधित विदयापीठाने उत्पादकास व आयुक्तालयास देणे बंधनकारक राहील.

ब) **कृषि विदयापिठाने विकसित केलेल्या कृषि यंत्र व औजारांचा राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमध्ये समावेश करून महा-डीबीटी प्रणालीव्दारे शेतक-यांना उपलब्ध होणेसाठी दर व अनुदान निश्चितीकरीता अनुसरावयाची कार्यपध्दती.**

१. कृषि विदयापिठाने विकसित केलेल्या कृषि यंत्र व औजारांचे दर व अनुदानाची रक्कम निश्चित करण्यासाठी आयुक्तालय स्तरावर शासन निर्णय क्रमांक-कृयांयो-०४२१/प्र.क्र.६४/१४-अे दिनांक ११ मे २०२१ अन्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | **आयुक्त (कृषि)** | **अध्यक्ष** |
| 2. | विभाग प्रमुख (कृषि यंत्रे व शक्ती विभाग) सर्व कृषि विदयापीठे | सदस्य |
| 3. | महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ(यंत्रे व औजारे) विभाग प्रमुख | सदस्य |
| 4 | महाराष्ट्र लघु उदयोग विकास महामंडळ(यंत्रे व औजारे) विभाग प्रमुख | सदस्य |
| 5 | सी.आय.अे.आय.भोपाळ, या संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| 6 | **संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण)** | **सदस्य सचिव** |

२. कृषि विद्यापीठाद्वारे विकसित सर्व प्रकारच्या नविन औजारांचा समावेश योजनेमध्ये करण्यासाठी उत्पादकाने (सामंजस्य करार केलेला उत्पादक) विहीत नमुन्यातील सविस्तर प्रस्ताव नोंदणीसाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे सादर करणे आवश्यक राहील. प्रस्तावाचा विहीत नमुना आयुक्तालयाकडुन निश्चीत करुन देण्यात येईल.

३. कृषि विद्यापीठाद्वारे विकसित नविन यंत्र/औजाराचे स्पेसिफिकेशन, उपयुक्तता, गुणवत्ता, तपासणी अहवाल, माहीतीपत्रक, प्रस्तावित किंमत ई.संबंधित उत्पादकाने प्रस्तावासोबत जोडलेले असावे.

४. कृषि विद्यापीठाद्वारे विकसित नविन व नाविन्यपुर्ण औजारांचे उत्पादन खाजगी उदयोजकाव्दारे करण्यात येणार असल्यास कृषि विदयापीठाने/उत्पादकाने सदर उत्पादकाशी केलेल्या कराराची (MOU) प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

५. कृषि विद्यापीठाद्वारे विकसित नविन यंत्र/औजाराचे उत्पादन कृषि विदयापीठाशी करार केलेल्या उत्पादकाव्दारे उत्पादन करण्यात येणार असल्याने सदर उत्पादकाची औजारे निर्मीतीची वार्षिक उत्पादन क्षमता नमुद करावी.

६. विदयापीठाशी आपसी सामंजस्य करार (MOU) केलेल्या सदर उत्पादकाने वर्षाच्या कोणत्याही कालावधीत स्वत: होउन उत्पादन प्रक्रियेतून माघार घेतल्यास त्याची पात्रता संपुष्टात येईल व त्यास पुन्हा संधी देण्यात येणार नाही.

७. उपरोक्त नमुद राज्यस्तरीय तांत्रिक समिती, उत्पादकाकडुन प्राप्त झालेले दर दर पृथ्थकरणासह (rate analysis) तपासून औजारांच्या महत्तम किंमती निश्चीत करील व त्याआधारे राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमध्ये सदर कृषि यंत्र औजारांना दयावयाच्या अनुदानाची रक्कम व प्रमाण निश्चित करेल. तथापि कोणत्याही कृषि यंत्र औजारांना दर पृथ्थकरणाच्या आधारे निश्चित केलेल्या महत्तम किंमतीच्या ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

८. कृषि यंत्र व औजारांचे तांत्रिक निकष (Technical Specifications) दर पृथ्थकरणाचे आधारे राज्यस्तरीय तांत्रिक समितीने निश्चित केलेली महत्तम किंमत,प्रस्तावित अनुदानाची रक्कम व प्रमाण या बाबीचा स्पष्टपणे समावेश असलेला प्रस्ताव, आयुक्त (कृषि) यांचे मान्यतेने शासनास सादर करण्यात येईल.

९. सदर प्रस्तावास शासन स्तरावर राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मा. सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समिती व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीची मान्यता घेण्यात येईल.
१०. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता झाल्यानंतरच सदरची कृषि यंत्रे औजारे महा-डीबीटी प्रणालीव्दारे राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमधुन शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

**क) खाजगी उत्पादकांनी विकसित केलेल्या परंतु स्वामित्व हक्क नसलेल्या** (Non-Patented) **नाविन्यपुर्ण कृषि यंत्र औजारांची कृषि विद्यापीठाद्वारे तांत्रिक तपासणी करुन राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमध्ये महा-डीबीटी प्रणालीव्दारे शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करुन देण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती.**

१. खाजगी उत्पादकाव्दारे विकसित परंतु स्वामित्व हक्क नसलेल्या (Non-Patented) सर्व प्रकारच्या नविन यंत्र/औजारांची माहिती संबंधित उत्पादकांनी सविस्तर प्रस्तावाच्या स्वरुपात संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण, कृषि आयुक्तालय पुणे यांचे कडे सादर करावी. प्रस्तावासोबत त्याचे स्पेसिफिकेशन, उपयुक्तता, गुणवत्ता, माहितीपत्रक जोडावे व यंत्र/औजाराची प्रस्तावित किंमत, तपासणी अहवाल सादर करावेत. तसेच उत्पादकाचे संबधित विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. यंत्र/औजाराचे समावेशाचे नोंदणीसाठी केवळ उत्पादक पात्र राहतील. प्रस्तावाचा विहीत नमुना आयुक्तालयाकडुन निश्चीत करुन देण्यात येईल.
२. खाजगी उत्पादकांनी विकसित केलेल्या परंतु स्वामित्व हक्क नसलेल्या (Non-Patented) नाविन्यपुर्ण कृषि यंत्रे औजारे कृषि विदयापीठाच्या तांत्रिक समितीमार्फत प्रमाणित करावयाच्या चाचणीकरीता कृषि विदयापीठाकडे सादर करावी लागतील.
३. कृषि विद्यापीठांनी संबंधित कृषि यंत्र/औजारांची क्षेत्रीय चाचणी घेवुन तांत्रिक क्षमता तपासावी. सदर यंत्र/औजार शेतक-यांना फायदेशीर ठरण्याच्या दृष्टीने तपासणीअंती कृषि विदयापीठाच्या सर्व तांत्रिक निकषांची पुर्तता करत असल्यास कृषि विदयापीठाच्या तांत्रिक समितीमार्फत सदर यंत्र/औजार प्रमाणित करण्यात यावीत तसेच उत्पादनांचे तांत्रिक निकष (Technical Specifications) निश्चित करण्यात यावेत व त्याबाबतचा तपासणी अहवाल व विदयापीठाच्या सक्षम प्राधिका-याची शिफारस संलग्नित करावी.
४. खाजगी उत्पादकांनी विकसित केलेल्या व कृषि विद्यापीठांनी प्रमाणित केलेल्या कृषि यंत्र व औजारांचा (Non-Patented) राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमध्ये समावेश करण्यासाठी कृषि आयुक्तालयाकडुन दरवर्षी अशा उत्पादकांकडुन स्वारस्याची अभिव्यक्ती प्रस्ताव (Expression of Interest) मागविण्यात येतील.

५. सदर प्रस्तावावर वरील ब-१ मध्ये गठीत राज्य स्तरीय तांत्रिक समिती उत्पादकाकडुन प्राप्त झालेले दर,दर पृथ्थकरणासह (Rate Analysis) तपासून औजारांच्या महत्तम किंमती निश्चिीत करील व त्या आधारे राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमध्ये सदर कृषि यंत्र औजारांना दयावयाच्या अनुदानाची रक्कम व प्रमाण निश्चित करेल. तथापि कोणत्याही कृषि यंत्र औजारांना दर पृथ्थकरणाच्या आधारे निश्चित केलेल्या महत्तम किंमतीच्या ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

६. कृषि यंत्र व औजारांचे तांत्रिक निकष (Technical Specifications) दर पृथ्थकरणाचे आधारे राज्यस्तरीय तांत्रिक समितीने निश्चित केलेली महत्तम किंमत, प्रस्तावित अनुदानाची रक्कम व प्रमाण या बाबीचा स्पष्टपणे समावेश असलेला प्रस्ताव आयुक्त (कृषि) यांचे मान्यतेने शासनास सादर करण्यात येईल.
७. सदर प्रस्तावास शासन स्तरावर राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मा.सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य स्तरीय प्रकल्प छाणणी समिती व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीची मान्यता घेण्यात येईल.
८. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता झाल्यानंतरच सदरची कृषि यंत्रे औजारे महा-डीबीटी प्रणालीव्दारे राज्य पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनेमधुन शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येतील.
९. स्वामित्व हक्क नसल्यामुळे सदर उत्पादनांची एकापेक्षा अधिक उदयोजक निर्मिती करु शकतील, संबंधित प्रत्येक उदयोजकास त्याकरीता कृषि विदयापीठाचा तपासणी अहवाल (Test Report) व विदयापीठाच्या सक्षम प्राधिका-याची शिफारस सादर करणे आवश्यक राहील.
१०. खाजगी उदयोजकामार्फत विकसित कृषि यंत्र व औजारांची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टिने उत्पादीत होणा-या औजारांपैकी किमान २ टक्के औजारांची तांत्रिक तपासणी कृषि विद्यापीठाद्वारे करावी. तपासणीचा खर्च संबंधित उत्पादकास करावा लागेल.

**ड) उत्पादकांकरीता सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. कृषि यंत्र व औजारांचा उत्पादक हा सक्षम प्राधिका-याकडे नोंदणीकृत असावा.
२. कृषि यंत्र औजारे उत्पादकाने कृषि यंत्र व औजारांची किमान एक वर्षाची गुणवत्तेची लेखी हमी देणे, कृषि यंत्र/औजारात कोणताही दोष आढळल्यास त्याची विनामुल्य दुरूस्ती करुन देणे अथवा बदलुन देणे, सुटया भागाची उपलब्धता व विक्री पश्चात सेवा सुविधा पुरविणे, औजारांच्या देखभालीसाठी मराठीत माहितीपत्रक उपलब्ध करवुन देणे आवश्यक राहील.
३. या कार्यपध्दतीमध्ये खाजगी उत्पादकांच्या पेटंट प्राप्त औजारांचा समावेश करता येणार नाही.
४. खाजगी उत्पादकाव्दारे विकसित कृषि यंत्र व औजारांचा योजनेंतर्गत समावेश त्यांच्या ब्रँड नावाने न करता तांत्रिक नावानेच करावा लागेल. सदर औजारासाठी कृषि विदयापीठाने तपासणी करुन निश्चित केलेले तांत्रिक निकष (Technical Specifications) लागू राहतील.

५. कृषि विभागामार्फत औजारांची गुणवत्ता तपासणी वर्षाच्या कोणत्याही कालखंडात यादृच्छीक (random) पध्दतीने करण्यात यईल. सदर औजार तपासणीसाठी कृषि विदयापीठाकडे पाठविण्यात येईल व सदर तपासणीत औजार दिलेल्या मानकाची पुर्तता करत नसल्यास उत्पादकाचा काळया यादीत समावेश करण्यात येईल.
६. सौर उर्जाचलीत फवारणी यंत्राचे सोलर पॅनलची तपासणी नविन आणि नुतनीकरण मंत्रालय भारत सरकार यांनी मान्यता दिलेल्या संस्थाकडुन करणे आवश्यक राहील.

७. सर्व प्रकारची स्वयंचलीत औजारे/उपकरणे व पिक संरक्षण उपकरणे यासाठी केवळ संबंधित केंद्रीय तपासणी संस्थां अथवा याकामी प्राधीकृत तपासणी संस्थाचाच तपासणी अहवाल ग्राहय राहील.
८. उत्पादकाने वर्षाच्या कोणत्याही कालावधीत स्वत: होउन उत्पादन प्रक्रियेतुन माघार घेतल्यास त्याची पात्रता संपुष्टात येईल व त्यास पुन्हा संधी देण्यात येणार नाही.
९. उत्पादकाची मागणीप्रमाणे सर्व जिल्हयात औजारांचा पुरवठा करण्याची तयारी असावी व तसे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.
१०. नविन कृषियंत्र/औजारे परीक्षण अहवालाचा (Test Report ) वैध कालावधी व त्याची वैधता मान्यताप्राप्त तपासणी संस्था (कृषि विदयापीठाकडुन) वाढवुन घेण्याची जबाबदारी उत्पादकाची राहील.
११. सदर यंत्र व औजाराचा विहीत नमुन्यातील तपासणी अहवाल संबंधित उत्पादकाने आयुक्तालयास देणे बंधनकारक राहील.
१२. योजनेत समाविष्ठ करतांना ज्या उत्पादकांनी प्रत्येक कृषि औजारांच्या दृष्य भागावर कंपनीचे नाव/मॉडेल नाव/लॉट नंबर/मेक क्रमांक/सिरीयल नंबर व प्रमाणिकरण संस्थेने दिलेला प्रमाणीकरणाचा अनुक्रमांक छापला असणे आवश्यक राहील.
१३. सर्व उत्पादकांच्या यंत्रे/औजारेबाबतच्या प्राप्त सर्व प्रस्तावाच्या नोंदी आयुक्तालय स्तरावर ठेवण्यात येतील.
१४. खाजगी उत्पादकाव्दारे विकसित व उत्पादित औजाराचा एक मुळ नमुना कायमस्वरुपी जतन करण्यासाठी कृषि विदयापीठाकडे हस्तांतरीत करावा लागेल.

**कृषि संचालक**
**निविष्ठा व गुण नियंत्रण**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे**